**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language**,
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2016 = 4.44, www.srjis.com***
*UGC Approved Sr. No.48612, OCT- NOV 2017, VOL- 4/24*

# सातपुडयातील संस्कृति संघर्षाचे नवे वळण

**गीता शिंदे[१], Ph. D., माधुरी इसावे[२], Ph. D. & इंदिरा शिंपी[३]**

**Abstract**

*सातपुडा पर्वत रांगामधील रहाणारे आदिवासी समाज मोठया प्रमाणात विखुरलेला आहे. आदिवासींच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी आदिवासी बचाव अभियानातर्फे होणाऱ्या मेळाव्यात समांतर म्हणून रा.स्व.संघाच्या वतीने झालेल्या मेळाव्यामुळे 'अभियाना'पुढे नवेच आव्हान उभे राहिले आहे. यामुळे सातपुडयातील संस्कृति संबंधाने नवे वळण घेतले आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून आदिवासींसाठी सुरु असलेलया सेवाकार्याच्या पुढे पाऊल टाकताना यंदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ थेट मेळावे घेण्यासाठी नंदूरबार पासून बालाघाट पर्यंत पसरलेल्या सातपुडयाच्या रांगामध्ये उतरला. विशेष म्हणजे संघचालक डॉ. मोहन भागवत यांनी १४ जानेवारीच्या २०१६ च्या नंदूरबार मेळाव्यात मार्गदर्शन केले. रावणपुत्र इंद्रजित किंवा मेघनाथ हा कोरकू मुळपुरुष. अमरावती जिल्हयातील कारकुंबह मेळघाटात 'कोठा' येथे २९ जानेवारीला झालेल्या मेळाव्यालाही डॉ. भागवत उपस्थित होते. भाजपच्या मंत्र्यांनी आदिवासी विकासात अडथळा बनू नये' अशा अधिकारवाणीच्या कानपिंचक्याही त्यांनी दिल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पुण्यातील मेळाव्याच्या केंद्रस्थानी जसे छत्रपती शिवाजी महाराज हे बहुजनांचे श्रध्दास्थान होते. तसेच नंदूरबारच्या मेळाव्यात महायोगी देवमोगरा माता, बिरसा मुंडा, तंटया भिल्ल या आदिवासींमध्ये बिंबवण्याचा प्रयत्न या मेळाव्यामधून झाला.

संघाने हे मेळावे नेमके याच वेळी घेण्याचे कारण वेधक आहे. 'आदिवासी बचाव अभियान' नावचे मोठे संघटन गेली २३ वर्षे सातपुडयाच्या परिसरात दरवर्षी जानेवारीच्या मध्यात मोठा मेळावा होतो. सातपुडयातील पावरा, भिल्ल, कोकणा, वगैरे आदिवासी जमातींचे वैचारिक संघटन घडविण्यासाठी आदिवासींच्या विविध प्रश्नावर चर्चा करण्यासाठी त्या जमातीच मूळ सांस्कृतिक ओळख टिकविण्यासाठी, झालेच तर लेखन वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी हे मेळावे होतात. गेल्या वर्षी सप्तश्रृंगी गडाच्या

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

पायथ्याला नांदुरी—वणी येथे, तर २०१६ मध्ये हा मेळावा मध्यप्रदेशच्या खरगोण जिल्हयातील झिरन्या येथे दि. १४ व १५ जानेवारी २०१६ मध्ये झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मेळावा त्याला समांतर होता. महाराष्ट्रातील १३ जिल्हे तसेच नऊ राज्यांमधील लाख/दीड लाख आदिवासी कार्यकर्ते झिरन्या मेळाव्याला उपस्थित होते. गेल्या पाच/सहा वर्षापासून अशा मोळाव्यात वेगळया 'भिल्लीस्तान' राज्याची मागणी होतेच आहे. ती मूळ मागणी 'भिल्लीस्तान टायगर' नावाच्या राजस्थानमधील संघटनेची आहे. ब्रिटिशांविरुध्द लढताना ५०० आदिवासी लढवैय्यांनी हौताम्य पत्करले. त्या मानगड येथे तिचा पहिला उद्घोष झाला.

या परस्पर विरोधी मेळाव्यांमुळे सातपुडयातील संस्कृति संघर्षानो नवे वळण घेतले आहे. पूजनीय कारण 'संघ सांगतो तो राम' की परंपरा सांगतो तो रावण, हा प्रश्न आदिवासांनी पडलाय, कडाक्याचे थंडीचे दिवस डोंगरदऱ्यामधील वैचारिक वातावरण तांपले आहे. संघाच्या आक्रमकतेला प्रतिसाद देतांना त्या वर्षी आदिवासी बचाव अभियानाने नारा दिला. 'ना गिरीजन, ना वनबंधू, ना वनवासी, हम आदिवासी इस देश के मूलनिवासी!' आदिवासींचा बचाव कुणापासून, यावर अभियानाचे प्रमुख अशोक बागूल सांगतात, अलीकडच्या कळात हिंदूकरणापासूनच या मूळ निवासी समूदायाचा बचाव करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे खऱ्यांचे लुबाडणाऱ्या बोगस आदिवासींच्या घुसखोरी पासूनही बचाव करायचाय. आदिवासीच्या धर्म वेगळा, संस्कृति वेगळा, देवदेवता, पूजापध्दती असे सारखे अहिंदू आहे. जंगल जमीन वाचण्यिासाठी उभारलेले लढे, तसेच परकी आक्रमणांचा मुकाबला करताना रचलेला इतिहासही वेगळा अन्दैदिप्यमान आहे. तथापी मुख्य प्रवाहाने तो दाबून टाकला. विकृतीकरण केले. कधीकाळी ख्रिस्ती व अन्य ध्र्मानी सेवा कार्याच्या आडून आदिवासीना त्यांच्या पंथात ओढण्याचा प्रयत्न केला तर आता हिंदू धर्म तेच करतोय. एकदा आम्ही सगळे एकच आहेत, असे म्हअले, की आक्रमक आर्यानाही मूळ निवासी बनता येते. ही खरी समस्या आहे.

खरे तर मूळ निवासी कि हिंदू या ओळखीपेक्षा आदिवासींची गरज वेगळीच आहे. रोजीरोटीचा प्रश्न कधी नव्हते इतका टोकदार बनला आहे. रोजगारासाठी त्यांना

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

स्थलांतर ही राष्ट्रीय समस्या बनली आहे. त्याा आठवडयात राष्ट्रीय अनुसूचित जाती—जमाती आयोगाचे अध्यक्ष डॉ. रामेश्वर ओरान व त्यांचे सदस्य सहकारी नाशिकला गेले होते. आदिवासी शिक्षणाची परवड शारीरिक व बौध्दिक कुपोषणाची केंद्रे बनलेल्या आश्रमशाळा, बोगस आदिवासींचा प्रश्न आणि रोजगारांसाठी स्थलांतर हे प्रश्न जटील बनल्याचे आयोगाच्या बैठकांमध्ये अधोरेखित झाले. ‘आयटेटिटी क्रायासिस’ च्या पलिकडच्या या समस्या आहेत.

लोकसभा व विधानसभेच्या बहुतेक जागा भाजपाकडे आहेत. वनवासी मेळाव्यामध्ये ते लोकप्रतिनिधी जातीने हजर होते. त्यांना सक्रिय यागदान दिले. पण या सगळया घडमोडीमुळे सुशिक्षित मंडळींनी सुरु केलेल्या आदिवासी बचाव अभियानापुढे एक नवेच आव्हान उभे राहिले आहे. सर्वसामान्य आदिवासी ज्यांकडे अपेक्षेने पाहतो, ते त्यांचेच लोकप्रतिनिधी संघाच्या गणवेषात वावरु लागल्याने एक वेगळया प्रकारचे सामूहिक अवघडलेपण आले आहे. संस्कृति संघर्षाचा विचार करता लोकप्रतिनिधीनी राजकारण व आदिवासी संस्कृति याचा सुटा सुटा विचार करायला हवा. जेणेकरुन समाजाच्या वैचारिक वर्तुळाची अडचण होणार नाही.

वास्तविक पाहिता आदिवासींच्या अनेक अडचणी, समस्या आणि जीवघेण्या जीवनमान याचा विचार होणे तद्वतच त्याचे निराकरण होऊन शासन पातळीवर योग्य सुलभ नियोजन आणि त्यांना (आदिवासीच्या शेवटच्या घटकाला)लाभ मिळाला पाहिजे.

डोंगर कपारीत राहिल्यामुळे, मुळनागरवस्तीचे शहरी सुसंस्कृत लोकांचे यांच्याकडे लक्षच दिले जात नहाी. त्यांना मुख्य प्रवाहात आणायचे याच नुसार गलबला केला जाते. पण प्रत्यक्ष आदिवासी समाज व नागरी वसाहत यांच्यात खूप मोठा दुरावा, अंतर, भेद निर्माण झाला आहे. कित्येक वर्षापासून त्यांच्या जीवन पध्दतीत काही फरक, नाविण्यपणा आलेला नाही. प्रत्यक्ष भेटीत तर त्यांच्या अनेक समस्या समोर जाणवू लागल्या. कुपोषण रोजगारीचा प्रश्न, कुटूंब नियोजनाचा अभाव, अनाडीपणा, व्यसनाधिता, अशिक्षित, दारिद्र्याने ग्रासलेला. हवामान प्रतिकूल अशा विपन्नावस्थेत आदिवासी आज जगत आहे. प्रश्न अनेक अनंत आहेत पण त्यावर लोकसहभाग

चळवळ व सरकारी यंत्रणेने युध्द पातळीवर कार्य केले तर तो समाज चांगल्या प्रकारे कमीत कमी सामान्य माणसाप्रमाणे जीवन जगू शकेल.

या सर्वांवर एकच उपाय प्रखरपणे मांडता येईल की, शासनानेच अनेक माध्यमांच्या अंतर्गत आदिवासींची माहिती गोळा करुन त्यांच्यात युध्दपातळीवर नियोजन व अंमलबजावणी करणे जरुर आहे. नुसते मेळावे, अधिवेशने घेऊन काम होत नाही तर ठोस निर्णयाची गरज आहे. याचप्रमाणे जर अविरत प्रयत्न केला तर आदिवासींना न्याय मिळेल आणि त्यांना देखील हायसे वाटेल की आपल्या पाठीमागे कोणीतरी खंबीर उभा आहे. सरकार खूप मोठया प्रमाणत निधी आदिवासींच्या करिता खर्च करते. परंतू वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून (मंत्र्यापासून खालच्या माणसापर्यंत)Chainचेन असते. त्यांचेच आतल्या आत सुविधा न देण्याच्या पळवाटा सुरु असतात. त्यामुळे बिचारा आदिवासी मनुष्य हतबल होतो. कडक कारवाई करणे योग्य विचारपूर्वक नियोजन करणे आणि त्यावर बारकाईने लक्ष पुरविणे आवश्यक आहे असे असेल तरच आदिवासी हे मुख्य नागरी व्यवस्थेत येऊ शकतील.

सरतेशेवटी मी तर एवढेच नमूद करु इच्छिते की, संस्कृति संघर्षाचे नवे वळण जरी घडत असले तरी त्यादृष्टीने आदिवासी जागृत डोळस वृत्तीने जगत आहेत ह जाणीव त्यांच्यात झाली तरी काही कमी नाही, असे असते तरी संस्कृति—सांस्कृतिक हे शब्द वरवरचे वाटतात. मुळात आदिवासींचे जगण्याचे अस्तित्व, माणूस म्हणून त्याचे अस्तित्व हे जाणून घेतले पाहिजे, टिकविले पाहिजे. त्यांचे जगण्याचे मूळ अस्तित्व धोक्यात घालून चालणार नाही.

**संदर्भ :—**

*गारे गोविंद,(१९५४) सहयाद्रीतीय आदिवासी महादेव कोळी पहिल आवृत्ती*

*गारे गोविंद,(१९७५) भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती,पुणे आदिम*

*जोशी लक्ष्मणशास्त्री, (१९७२) वैदिक संस्कृतीचा विकास दुसरी आवृत्ती.प्राज्ञ पाठाशाळा मंडळ,वाई पृष्ठ ४४—४५.*

*मुळे,रा.शं.व.उमाठे वि.तु.(१९७८)शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपुर,महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.*

*माने लक्ष्मण(१९९७) विमुक्तायन,प्रथम आवृत्ती,यशवंतराव चव्हाण, प्रतिष्ठानगर, मुंबई, पृष्ठ क्र.२.*

*शिरोळे धैर्यशील (२००२) — आदिवासी कथा व व्यथा,स्नेहवर्धन प्रकाशन,द्वितीय आवृत्ती, पुणे.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*